# THE MES RANI LAXMIBAI MULINCHI SAINIKI SHALA

**शुभेच्छा समारंभ** **सोमवार दि.** 15 सप्टेंबर 2025

आज सोमवार दि. 15 सप्टेंबर 2025 रोजी प्रशालेचे सिनियर मास्टर श्री. श्याम नांगरे सर यांची पर्यवेक्षक पदी पदोन्नती झाली. त्यानिमित्ताने प्रशालेच्या वतीने शुभेच्छा- सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. सर्वात प्रथम सरांचे औक्षण करून कार्यक्रमास सुरुवात झाली. इयत्ता दहावी मधील कॅडेट यशस्वी पाडवे हिने श्री. श्याम नांगरे सर यांच्याविषयी मनोगत व्यक्त केले. तसेच प्रशालेतील ज्येष्ठ शिक्षक श्री. अद्वैत जगधने, ज्येष्ठ शिक्षिका सौ मंजिरी पाटील , श्री. मंगेश पाटील, सौ. दिपाली आंबेकर यांनी मनोगत व्यक्त केले. या सर्वांनी सीनियर मास्टर श्री. शाम नांगरे यांनी आपल्याला दिलेली आपुलकीची वागणूक आणि केलेले बहुमूल्य मार्गदर्शन याबाबतीत ऋण व्यक्त केले.

या प्रसंगी श्री. शाम नांगरे यांनी अत्यंत भावूक मनोगत व्यक्त केले. प्रशालेमध्ये सुरवातीपासूनच असल्याने त्यांच्या मनोगतातून प्रशालेची वाटचालच जणू उलगडत गेली. त्यांनी त्यांच्या सर्व सहकारी यांच्याशी असणारे आपले नाते विशद करून अनेक आठवणी जागवल्या.

सौ दिपाली आंबेकर यांनी स्काऊट गाईड प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. प्रशालेच्या प्राचार्या सौ. ज्योती खिरीड, प्रशालेचे विंग कमांडर एम. यज्ञरामण यांनीही पुढील कार्यासाठी श्री श्याम नांगरे यांना शुभेच्छा दिल्या. प्रशालेचे नवनियुक्त सिनियर मास्टर श्री. संदीप पवार यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री महेश कोतकर यांनी केले.

















**Event Coord :** **परिपाठ विभाग प्रमुख, श्री. महेश कोतकर**

---

**Senior Master :** **श्री. संदीप पवार**

---

Principal : **सौ. ज्योती खिरीड**

---

Commandant : **एवीएन विंग कमांडर एम. यज्ञरामन**

---